



Education : An Ennobling Influence

Gopal Krishna Gokhale

GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS, PUNE


# संघर्षाकडून सहजीवनाकडे

## वन्यजीवांमुळे शेतमालचे नुकसान : भरपाई प्रक्रिया आणि मार्गदर्शन

२०२५




Centre for Sustainable Development






२०२५

लेखन आणि संकलन: प्रा. डॉ. मिलिंद वाटवे
संपादन: वैदेही दांडेकर

प्रकाशक:
शाश्वत विकास केंद्र,
गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था,
पुणे

# वन्य प्राण्याने पिक नुकसान झाले ?

## नुकसान भरपाई मागणी प्रक्रिया




महत्वाची नोंद

- नुकसान भरपाई अर्ज स्पीड पोस्ट ने पाठवता येतो
- नुकसान भरपाई अर्जा मध्ये, एकाच वेळी जर एका पेक्षा अधिक पिकांचे नुकसान झाले असेल तर त्याची नोंद करू शकतो. प्रत्येक पिकाचा नुकसानाचा तपशील लिहावा
- परस बागेतील पिक / भाजीपाला / फळांचे नुकसान वन्य प्राण्यांकडून झाल्यास त्यासाठी नुकसान भरपाई अर्ज करता येऊ शकतो.
- नुकसान झाल्याच्या प्रत्येक वेळेला नुकसान भरपाई मागू शकतो (वर्षभरात कितीही वेळा)

**अपील अ १ आणि अ ४ या अपिलाचा मजकूर कारणा प्रमाणे बदलू शकतो म्हणून त्याचा ठराविक साचा पुढील मजकुरात दिलेला नाही.**

# अर्ज

प्रति,
मा. वनपरिक्षेत्र अधिकारी
वनपरिक्षेत्र कार्यालय
--------------------------------------------------

अर्जदार :- श्री / श्रीमती.
राहणार--------------तहसिल-------------जिल्हा---------------

विषय :- वन्यप्राण्यांनी केलेल्या शेतपिकांची नुकसान भरपाई मिळणेबाबत.

महोदय,

सविनय विनंती आहे की, माझे शेतातील--------या पिकाचे नुकसान जंगली रानडुकर/निलगाय (रोही) /वानर/-------या जंगली जनावरानी दि. / / २० रोजी केले असून एकूण नुकसान अंदाजे-------------रूपयांचे आहे. माझे शेत मौजा------येथे असून त्याचा सर्व्हे नंबर -------हा असून आराजी(एकूण)-------आहे.

झालेल्या नुकसानाचा तपशील आणि एकूण नुकसानाचा मी केलेला अंदाज सोबत जोडला आहे. तरी नियमाप्रमाणे पंचनामा करून मी नोंदलेला तपशील बरोबर असल्याची खात्री करावी आणि त्याप्रमाणे नुकसान भरपाई विहित मुदतीत देण्यात यावी ही विनंती.

बॅंक पासबुक प्रत/ खाते तपशील सोबत जोडले आहे.
मोबाइल नंबर ------------------------------------
ठिकाण -----------------

सोबत जोडलेली कागदपत्रे:
1)नुकसानीचा तपशील
२) संबंधित७/१२
३) ना हरकत प्रमाणपत्र (७/१२अनेकांचेनावेअसल्यास)
४) बॅंक पासबुक प्रत/ बँक शाखा व खाते क्रमांक

अर्जदाराची सही
दिनांक

शेत नुकसानाचा तपशील (अर्जा सोबत जोडण्यासाठी)

सर्व्हे क्रमांक

शेताची चतु:सीमा :-
पूर्वेस-----------------------
पश्चिमेस---------------------
उत्तरेस-----------------------
दक्षिणेस-----------------

नुकसानीचा तपशील

| क्रमांक | पीक/ झाडे | प्राणी | प्रमाण/संख्या चौरस मिटर/ गुंठे/ रोपे/ झाडे/ फळे | बुडालेले अपेक्षित उत्पन्न | बाजारभाव | एकूण अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

मी स्वतः हा तपशील बारकाईने नोंदला आहे व पंचनाम्याचे वेळेस ते दाखवून देण्याची तयारी आहे. पंचनाम्याची तारीख व वेळ या मोबाईल वर मेसेज तथा फोन द्वारे कळवावी ही विनंती.

(स्वाक्षरी)

# अपील क्रमांक २: प्रथम

नाव-

पत्ता-

दिनांक-

प्रति,

माननीय महोदय,

मी दिनांक / /२० रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी, यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या------------------पिकाचे माझ्या अंदाजानुसार---------------- रू. चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता. झालेल्या नुकसानीचा संपूर्ण तपशील व त्यावरून काढलेला अंदाज सोबत जोडला होता.

या अर्जावर एक महिना पूर्ण होऊनही कोणतीही अधिकृत कार्यवाही झालेली नाही. शासन परिपत्रक क्रमांक :-डब्ल्यूएलपी-2016/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार अर्ज केल्यापासून १४ दिवसांचे आत तीनसदस्यांच्या अधिकृत समितीकडून मोका पंचनामा होणे अनिवार्य आहे. परंतु शासकीय नियमांना अनुसरून पंचनामा झालेला नाही.

वन्य प्राण्यांनी नुकसान केल्याचे पुरावे वेगाने नाहीसे होतात आणि उशिरा पंचनामा केल्यास ते दृष्टीस पडत नाहीत. विहित मुदतीत पंचनामा न झाल्या कारणाने आता माझा मूळ अर्जातील नुकसानीचा अंदाज सत्य मानून त्याप्रमाणे संपूर्ण नुकसान भरपाई देणे अनिवार्य आहे. पंचनाम्याची मुदत उलटून गेल्यावर पुरावे दिसत नाहीत या कारणाने माझा दावा नाकारण्याचे अधिकार वन खात्यास नाहीत. वन खात्याकडून विलंब झाल्यास त्याची शिक्षा शेतकऱ्यास देणे न्यायास धरून नाही.

तरी माझ्या मूळ अर्जात व्यक्त केलेला नुकसानीचा तपशील व अंदाज सत्य मानून मला -------------- रू. ही नुकसान भरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतील व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,

नावः

सोबत: मूळ अर्जाची प्रत व पोच

# अपील क्रमांक २: द्‌वितीय

नाव
पत्ता-
दिनांक-

प्रति,
माननीय महोदय,

मी दिनांक --------- रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी, यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या _____ पिकाचे माझ्या अंदाजानुसार रू.---------- चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता. त्यावर योग्य ती कारवाई न झाल्यामुळे दिनांक / /२० रोजी मा. उपवनसंरक्षक यांचेकडे प्रथम अपील केले. यावरही आजतागायत योग्य कार्यवाही न झाल्यामुळे हे द्वितीय अपील करत आहे.

शासन परिपत्रक क्रमांक:- डब्ल्यूएलपी-2016II/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार अर्ज केल्यापासून१४ दिवसांचे आत तीन सदस्यांच्या अधिकृत समितीकडून मोका पंचनामा होणे अनिवार्य आहे. शासकीय नियमांना अनुसरून विहित मुदतीत पंचनामा न झाल्या कारणाने आता माझा मूळ अर्जातील नुकसानीचा तपशील व अंदाज सत्य मानून त्याप्रमाणे संपूर्ण नुकसान भरपाई देणे अनिवार्य आहे.

माझ्या मूळ अर्जात काही त्रुटी असतील अथवा इतर कोणत्याही कारणास्तव माझा नुकसान भरपाई अर्ज नाकारायचा असल्यास तसे मला विहित मुदतीत लेखी कळवणे अपेक्षित होते. तसे न कळविल्याने आता कोणत्याही कारणास्तव माझा अर्ज नाकारता येणार नाही. वन खात्याकडून विलंब झाल्यास त्याची शिक्षा शेतकऱ्यास देणे न्यायास धरून नाही.

तरी माझ्या मूळ अर्जात व्यक्त केलेला नुकसानीचा अंदाज सत्य मानून मला रू.----------ही नुकसानभरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतील व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,
नावः

# अपील क्रमांक 3: प्रथम

नाव
पत्ता
दिनांक:

प्रति,
(तुमच्या भागातील कार्यालय पत्ता)

माननीय महोदय,

मीदिनांक / /रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या------------पिकाचे माझ्या अंदाजानुसार रू. ----------- चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली होती.

या अर्जादाखल दिनांक | /२० रोजी नियमाप्रमाणे पंचनामा करण्यात आला. पंचनाम्याची प्रत मलादेण्यात आली/आली नाही. शासन परिपत्रक क्रमांक:- डब्ल्यूएलपी-2016/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार घटनेपासून २६ दिवसांत नुकसान भरपाईचे पैसे जमा होणे अपेक्षित आहे. हे मला अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

मला सदर नुकसान भरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतीलं व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,

नाव
सोबत जोडले आहे: मूळ अर्ज व नुकसानीचा तपशील

# अपील क्रमांक 3: द्वितीय

नाव
पत्ता
दिनांक

प्रति,
(तुमच्या भागातील कार्यालय पत्ता)

माननीय महोदय,
मी दिनांक / /20 रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी , यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या ----------पिकाचे माझ्या अंदाजानुसार रू.----------- चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली होती.

शासन परिपत्रक क्रमांक:- डब्ल्यूएलपी-2016/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार घटने पासून २६ दिवसांत नुकसान भरपाचे पैसे जमा होणे अपेक्षित आहे. हे मला अद्याप प्राप्त झालेले नाहीत. विहित मुदतीत नुकसान भरपाईचे पैसे जमा न झाल्याने दिनांक / /२० रोजी मा. उपवनसंरक्षक यांचेकडे प्रथम अपील केले. यावरही आजतागायत योग्य कार्यवाही न झाल्यामुळे हे द्वितीय अपील करत आहे.

वन खात्याकडून विलंब झाल्यास त्याची शिक्षा शेतकऱ्यास देणे न्यायास धरून नाही. तरी माझ्या मूळअर्जात व्यक्त केलेली रू.-------- ही नुकसान भरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतील व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,

नाव
सोबत जोडले कागदपत्र : मूळ अर्ज व प्रथम अपीलाच्या प्रती

# सेवा हक्क आयोगास अपील

**(कोणत्याही कारणास्तव केलेल्या प्रथम वा द्वितीय अपिलावर कार्यवाही न झाल्यास)**

मा. सेवा हक्क आयुक्त

...................

..............

विषय,

वन्य प्राण्यांकडून झालेल्या पीक नुकसानीच्या भरपाई अर्जावर योग्य कारवाई विहित मुदतीत न होणे.

माननीय महोदय,

मी अर्जदार नांव,

गाव .................................. तालुका ............. माझे शेत सर्व्हे क्रमांक ..................
येथे दिनांक / /२० रोजी वन्य प्राण्यांकडून झालेल्या पीक नुकसानीच्या भरपाई साठी अर्ज केला होता. त्यावर योग्य तो कार्यवाही ना झाल्यामुळे दि. / /२० रोजी प्रथम आणि दि. / /२० रोजी दुसते अपील दाखल केले. त्यावरही उचित कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे दाद मागत आहे.

वन्य प्राण्यांकडून झालेल्या पीक नुकसानीची भरपाई सेवा हक्क आयोगाच्या कक्षेत येत असून या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून मला न्याय मिळवून द्यावा ही विनंती.

प्रकरणाचा सर्व तपशील, मूळ अर्ज आणि दोन्ही अपिलांच्या प्रती जोडल्या आहेत.

आपला नम्र,

Gokhale Institute of Politics and Economics
(Deemed to be University)

Centre for Sustainable Development

# एका वर्षात महाराष्ट्रात वन्यप्राण्यांमुळे शेतकऱ्यांचे 10,000 कोटी रुपयांचे नुकसान होते

**सविस्तर माहितीसाठी**

**Farmerandwildlife.com**

शाश्वत विकास केंद्र ,गोखले राज्यशास्त्र आणि आर्थिक संस्था

**वनविभागाकडून मिळणाऱ्या नुकसान भरपाई संदर्भात सविस्तर माहितीसाठी QR कोड स्कॅन करा.**

## वन्य प्राणी- पिक नुकसान भरपाई संदर्भात तुम्हाला शेतकऱ्यांची मदत करायची आहे का ?

### कम्युनिटी रिसोर्स पर्सन (CRP) ट्रेनिंग : रजिस्ट्रेशन फॉर्म



| | |
|---|---|
| 👤 **CRP कोण :** | गावातील साक्षर, फोन असलेली व्यक्ती |
| 🌱 **काम:** | नुकसान भरपाई प्रक्रियेत मदत. |
| 📘 **ट्रेनिंग:** | CSD- GIPE कडून मोफत. |
| 📝 **CRP** | QR कोड स्कॅन करा, फॉर्म भरा. |
| ⚠️ **नोंद:** | स्वयंसेवी काम |

संशोधन प्रकल्पा साठी आर्थिक सहाय्य AUTUS